**देऊळ**

गावापासून दूर टेकडीवर, एक वास्तू अशी खास होती
जागेसाठी भांडणाऱ्यांनी, देवाला रहायला दिलेली; जागा होती ॥ १ ॥

सताड उघडी मातकट पायवाट, एकटीच दुहेरी पळत होती
काही मोजक्या भक्तांच्या पायात, कधीतरी घुटमळत होती ॥ २ ॥

भिंती ढाचा तसे जुने, ऊन; वादळवारे खात निर्धास्त उभे होते
वेळेला देवघर, क्षणी भक्तांस निवारा, असे त्यांचे काम होते ॥ ३ ॥

दाराबाहेर उभ्या वृंदावनात, तुळस वाऱ्यावर डोलत होती
अधूनमधून मिळणाऱ्या पाण्यावर, बहरायला शिकली होती ॥ ४ ॥

प्रवेश करता देवळात, कासव समोर साष्टांग होते
नजरेनेच पोसतो देव त्यास, हेच ते सुचवीत होते ॥ ५ ॥

पुढे जाता घनगर्द; गंभीर, सुबक छान गाभारा होता
ध्यान भग्न न हो देवाचे, म्हणून त्याचा पहारा होता ॥ ६ ॥

सुबक थोडी सावळी अशी, मूर्ती छान स्थापिली होती
आजवर ठेवलेल्या श्रद्धेची; ती, मूर्तिमंत आकृती होती ॥ ७ ॥

देवासमोर मिणमिणणारी, एकच लहानगी दिवटी होती
भक्त कोण आहे आला, एवढेच दाखवायची जबाबदारी होती ॥ ८ ॥

अशा थोड्या प्रकाशात, उदबत्ती दरवळून सोबतीस होती
जळून जाता पवित्र होऊन, भक्तांच्या ललाटी मिरवीत होती ॥ ९ ॥

आतून पुन्हा बाहेर निघता, उंबरठ्याची पथारी होती
हीच ती जागा; जिथे हर एक, पाठ/पाऊले; वळत होती ॥ १० ॥

कुणा आसरा सोबत, कुणा जागा व्यथा मांडण्याची
हीच वास्तू खास जिथे, सार्थ बोध जाणीव होई-

**सचिन पु. कुलकर्णी**

www.saarthbodh.com